# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल:pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ : साफुपुवि/निववि/२८६ दिनांक : ०५ सप्टेंबर,२०२२

प्रति,
१) मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

२) मा. विभाग प्रमुख, शैक्षणिक विभाग,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : वार्षिक अहवाल सन २०२१—२२ साठीची माहिती ऑनलाईन पध्दतीने पाठविणेसाठी दि. १५/०९/२०२२ पर्यंत मुदत वाढविल्याबाबत.

संदर्भ : १. या विभागाचे पत्र क्र. साफुपुवि/निववि/२२३, दिनांक ०१ जुलै, २०२२
२. या विभागाचे पत्र क्र. साफुपुवि/निववि/२६८, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा सन २०२१—२२ या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक अहवाल तयार करण्याचे काम सध्या नियोजन व विकास विभागात सुरु आहे. सदर अहवालासाठी आवश्यक असणारी माहिती विद्यापीठ विभाग, संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकडून उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये दि. १३ ऑगस्ट, २०२२ पर्यंत मागविण्यात आली होती. तसेच, उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये सदर मुदतीमध्ये दि. ०२ सप्टेंबर, २०२२ पर्यंत वाढ करण्यात आली होती. या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, सदर माहिती ऑनलाईन पध्दतीने भरण्यांची मुदत **दि. १५ सप्टेंबर, २०२२ पर्यंत वाढविण्यात आलेली असून, यापुढे कोणत्याही परिस्थितीत सदर मुदतीमध्ये वाढ करण्यात येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी कृपया नोंद घ्यावी.**

**सदर वाार्षिक अहवालाची माहिती फक्त ऑन-लाईन पध्दतीनेच सादर करावी. ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या माहितीची छापील प्रत (Printout) विद्यापीठास सादर करू नये.**

आपणांस विनंती की, विद्यापीठाच्या वार्षिक अहवाल २०२१—२२ साठीची माहिती विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने सादर करून विद्यापीठास सहकार्य करावे. सदर माहितीची पूर्तता विहित मुदतीत न झाल्यास शासनाकडून व विद्यापीठाकडून विविध योजनेअंतर्गत मिळणारे अनुदान, सोयी/सवलती व इतर लाभ प्रलंबित राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपली विश्वासू,

५/९/२०२२

(डॉ. वैशाली साकोरे)
उपकुलसचिव